महाराष्ट्र शासन

वृत्त क्र.१०६७ जिल्हा माहिती कार्यालय,उस्मानाबाद दि. २९.१२.२००९

शाकंभरी नवरात्रातील जलयात्रा उत्साहात

उस्मानाबाद दि.२९:- तुळजापूर येथे सध्या शाकंभरी नवरात्रानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या नवरात्रातील जलयात्रा आज आनंदी आणि भक्तीमय वातावरणात पार पडली. यावेळी तुळजाभवानी मंदिर परिसरात भक्तांची मोठी गर्दी झाली होती.

महाराष्ट्राच्या कुलस्वामिनीच्या म्हणजे तुळजापूर येथील तुळजाभवानीच्या शाकंभरी नवरात्रात जलयात्रा आयोजित केली जाते.आज तुळजापूरातील प्राचीन मंदीरात श्री इंद्रायणी देवीची तहसीलदार तथा श्री तुळजाभवानी मंदीर संस्थानचे सरव्यस्थापक श्री. देवेंद्र कटके व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सारीकाताई यांच्या हस्ते षोडशोपचार पुजा झाली. पापनाश तिर्थ येथे बंडुपंत पाठक, राजन प्रयाग, शरद कांबळे, निलोत्तम जेवळीकर आदींच्या मंत्रघोषात जल घटांचे विधिवत पुजन करण्यात आले. नंतर पापनाश तिर्थापासून महिला भक्तांनी आपापल्या डोईवर अंब्याच्या पानाने व फुलांनी सजवलेले जलघट व कलश घेऊन जलयात्रेस प्रारंभ झाला. या जलयात्रेत संबळ, हालगी, ढोल, ताशे व बँड पथक आदी वाद्यांसह आराधी, गोंधळी, वाघ्या-मुरळी, वासुदेव, भाविक भक्त असे साधारण ५ हजार भाविक भक्त सहभागी झाले होते. पुणे हडपसर येथील अमर ब्रास बँड पथक भाविकांचे आकर्षण ठरत होते.

या जलयात्रेत मंदीर संस्थानचे सहायक व्यवस्थापक दिलीप नाईकवाडी व कर्मचारी वृंद तसेच भोपी, पुजारी आदी सहभागी होते. या जलयात्रेचे यजमान किशोर गंगणे हे होते. याप्रसंगी प्रशासना कडुन पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.

--oo--